नाशिक
दि. १६/०८/२०१९

# प्रेसनोट

**आलोसे शिवाजी पांडूरंग चुंभळे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक यांना ३,००,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | शिवाजी पांडूरंग चुंभळे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | ६,००,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे भाचे जावई यांना ई—नाम योजनेअंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती नाशिक येथे ६ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी कामगार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. सदर नियुक्तीचा कालावधी संपल्याने तक्रारदार यांचे भाचे जावई यांना पुढील नियुक्तीपत्र देवून कामावर रूजू करण्यासाठी नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी पांडूरंग चुंभळे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,००,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दिनांक १३/०८/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने दिनांक १३/०८/२०१९ रोजी पडताळणी केली असता आलोसे शिवाजी पांडूरंग चुंभळे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ६,००,०००/— रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी ३,००,०००/— रूपयांचा पहिला हप्ता स्विकारण्याचे मान्य केल्याने त्यांचेविरूध्द आज दिनांक १६/०८/२०१९ रोजी सापळा आयोजीत केला असता आलोसे शिवाजी पांडूरंग चुंभळे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून ३,००,०००/— रूपये लाचेची रक्कम नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दालनात पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

16.8.19
( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता